# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक/बँक खाते/ ९०५/२०१४
दि.२७/११/२०१४

**वाचावे :** इकडील जा.क्र. रासनिप्रा/निवडणुक/बँक खाते/६६७/२०१४ दि.३/११/२०१४

**विषय : ' राज्य सहकार निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे '** या नावाने स्टेट बँक ऑफ इंडीया मध्ये बँक चालु खाते उघडणेबाबत...

### आदेश

प्राधिकरणाने विषयांकीत आदेशानुसार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व) यांना सहकारी संस्थांकडुन प्राप्त होणारा निवडणुक निधी जमा करणेकरीता भारतीय स्टेट बँकेत चालु खाते उघडणेस **" राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे "** या नावाने परवानगी दिलेली होती.

उक्त वाचावे दि.०३/११/२०१४ चे आदेशात अंशत: बदल करणेत येत असून या आदेशाव्दारे भारतीय स्टेट बँक किंवा मागील लागोपाठ तीन वर्षात लेखापरिक्षेत निदान 'अ' वर्ग मिळालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत **" राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे "** या नावाने बँक चालु खाते उघडणेस परवानगी देण्यात येत आहे.

बँक खाते उघडणेसंबंधात उपरोक्त वाचावे नुसार निर्गमित केलेल्या सूचना कायम असुन सदर खात्यावर महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये नमुद केलेल्या **'अ' व 'ब' वर्गातील सहकारी संस्थांचेच** निवडणुक निधीचे व्यवहार करावेत.

**सदरचे आदेश मा. आयुक्त यांचे मान्यतेने व निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव :-** विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना :-**
१.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

E:\pradhikaran१\letrs\बँक खाते.docx